xEstd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

४५ /२०२३

विषय:- सी.सी. टीव्ही कॅमेऱ्यांबाबत...

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स, प्रशासकीय अधिकारी व विभागप्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यापीठातील सर्व अधिविभाग तसेच प्रशासकीय विभाग व परिसरा मध्ये सी.सी.टीव्ही /आय.पी कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

आपल्या अधिविभागाच्या प्रवेशद्वाराजवळ व संवेदनशील ठिकाणी बसविण्यात आलेले सी.सी.टीव्ही कॅमेरे सुस्थितीत कार्यान्वीत आहेत किंवा कसे यांची खातर जमा करण्यात यावी. सदर सी.सी. टीव्हीद्वारे होणारे प्रक्षेपणाचे नियंत्रण व देखभालीचे कामकाज हे संगणक केंद्रामार्फत केले जात आहे. त्यामुळे या कार्यवाही मध्ये काही तांत्रिक अडचणी व त्रुटी उद्‌भवल्यास संगणक केंद्राच्या समन्वयाने त्या तात्काळ दूर कराव्यात. तसेच, आपल्या अधिविभाग व प्रशासकीय विभागामध्ये सुरक्षीततेच्या दृष्टीने जादा सी.सी. टीव्ही कॅमेरे आवश्यक वाटल्यास व ज्या अधिविभाग / प्रशासकीय विभागामध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरे अद्यापही बसविले नाहीत, त्यांनी त्याबाबत योग्य ती प्रशासकीय मान्यता घेवून आपल्या अधिविभागाच्या / प्रशासकीय विभागाच्या अंदाजपत्रकीय तरतूदी मधून ते संगणक केंद्रामार्फत खरेदी करुन घ्यावेत. तसेच सदर सी.सी.टीव्ही कॅमेऱ्यांच्या देखभाल व दूरूस्तीचा खर्च हा आपल्या अधिविभाग व प्रशासकीय विभागाच्या अंदाजपत्रकीय तरतूदीमधून खर्ची करण्यात यावा.

( डॉ. व्ही. एन. शिंदे )
कुलसचिव

जावक क्रमांक आस्थापना / ३६८९.

दिनांक:- 22 NOV 2023

प्रति,

सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स, प्रशासकीय अधिकारी व सेवक.

प्रत:- माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. मा. कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखाअधिकारी, यांचे कार्यालय.
२. मा. प्र.संचालक, संगणक केंद्र .
३. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

➢ विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी / सेवकांच्या निदर्शनास आणावे.